दैनिक
# पहिली बातमी
सत्य, साहस आणि जनतेचा आवाज...
दिनांक
01/08/2026
शनिवार
प्रत्येक क्षणाची बातमी... आपल्या हक्काची बातमी...

# राजर्षी शाहू सहकारी बँक लिमिटेड, येथे सायबर जनजागृती अभियान उत्साहात संपन्न

**हडपसर**

**क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' या उपक्रमांतर्गत सायबर जनजागृती सत्र उत्साहात पार पडले.**



या सत्रामध्ये अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स पल्लवी दरेकर आणि श्रेया शिंदे यांनी सर्वांना ऑनलाईन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव तसेच सुरक्षित इंटरनेट वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शाखा अधिकारी रवींद्र सावंत आणि सुनील देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात  सर्व बँक स्टाफ मेंबर यांना डिजिटल सुरक्षेचे महत्त्व सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगण्यात आले.

यावेळी प्रत्यक्ष उदाहरणे, प्रात्यक्षिके आणि संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग तसेच ऑनलाईन आर्थिक फसवणूकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले तसेच सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे समाधान करून घेतले.

यावेळी संस्थेच्या सर्व अध्यक्ष्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांनी सर्वांना सायबर सुरक्षेबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले आणि अशा जनजागृती उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

**या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी**

अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य प्रशांत मुळे, उपप्राचार्या शुभांगी औटी, संगणकशास्त्र विभागप्रमुख विलास वाणी तसेच प्रा. मनीषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर वॉरियर्सनी हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. पतसंस्थेतील अध्यक्ष व कर्मचाऱ्यांनी सायबर वॉरियर्सच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.